नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १४५ Issue - 145 | वार शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर २०२४ Blow- Friday Date 11 October 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## थोडक्यात

### मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या निर्णयाला आव्हान

मुंबई : कुणबी नोंद असलेल्या राज्यातील मराठ्यांच्या सग्यासोयऱ्यांनाही कुणबी जात प्रमाणपत्र देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्याबाबत काढलेल्या अधिसूचनेच्या मसुद्याला ओबीसी संघटनेने आव्हान दिले असून त्यावर उत्तर दाखल करण्यासाठी मुदतवाढ देण्याची राज्य सरकारने केलेली विनंती उच्च न्यायालयाने गुरूवारी मान्य केली. तसेच, चार आठवड्यांत याचिकेतील आक्षेपांवर उत्तर दाखल करण्याचे आदेश सरकारला दिले. ओबीसी वेल्फेअर फाऊंडेशनचे अध्यक्ष असल्याचा दावा करणाऱ्या मंगेश ससाणे यांनी सरकारने काढलेल्या अधिसूचनेच्या मसुद्याला जनहित याचिकेद्वारे आव्हान दिले आहे. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर त्यांच्या याचिकेवर गुरूवारी सुनावणी झाली.

## रतन टाटा यांना भावपूर्ण निरोप, अंत्यदर्शनासाठी सर्वसामान्यांची रीघ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांच्या पार्थिवावर गुरुवारी संध्याकाळी वरळी येथील स्मशानभूमीत शासकीय इतमामात, पारसी पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यापूर्वी नरिमन पॉइंट येथील एनसीपीए नाट्यगृह संकुलाच्या आवारात त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी राजकारणी, उद्योगपती तसेच टाटा उद्योग समूहातील कर्मचारी, सर्वसामान्य नागरिक यांची दिवसभर रीघ लागली होती.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंत्यदर्शन घेतले. टाटा यांना अखेरचा निरोप देण्यासाठी नरिमन पॉइंट परिसरात कर्मचारी आणि सामान्य नागरिकांनी मोठी गर्दी केली. सामाजिक भान असलेल्या या उद्योगपतीला निरोप देताना उपस्थितांकडून 'वंदे मातरम्'च्या घोषणा देऊन मानवंदना दिली जात होती.

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय उद्योग जगताचे नाव नेणारे उद्योगपती, सामाजिक भान जपणारे, दानशूर, द्रष्टे उद्योगपती, टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष रतन नवल टाटा यांचे बुधवारी रात्री मुंबईतील रुग्णालयात वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे पार्थिव गुरुवारी सकाळी दहा वाजल्यापासून नरिमन पॉइंट येथील एनसीपीए नाट्यगृहाच्या प्रांगणात ठेवण्यात आले होते.



टाटा कुटुंबीयांपैकी या वेळी रतन टाटा यांच्या सावत्र आई सिमॉन टाटा, त्यांचे बंधू नोएल टाटा, जिम्मी टाटा, माया टाटा आणि लेह टाटा हे उपस्थित होते. टाटा यांचे अत्यंत निकटचे सहकारी, व्यवस्थापक शंतनू नायडू उपस्थित होते. तसेच टाटा उद्योग समूहाच्या विविध संस्थांचे कर्मचारी गर्दीचे व्यवस्थापन करत होते. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास रतन टाटा यांचे पार्थिव त्यांच्या कुलाबा येथील निवासस्थानातून एनसीपीए येथे आणण्यात आले. तेव्हापासून अंत्यदर्शनासाठी असलेली रांग दुपारी साडेतीन वाजले तरी ओसरत नव्हती. या वेळी सर्वधर्मीय प्रार्थना म्हणण्यात आल्या. हिंदू, मुस्लीम, शीख, बौद्ध धर्मगुरूंची या वेळी उपस्थिती होती.

त्यानंतर प्रत्यक्ष अंत्ययात्रेला सुरुवात झाली तेव्हा उपस्थितांपैकी अनेकांच्या भावनांचा बांध फुटला. कर्मचारीवर्गही सुन्न झाला होता.

अंत्ययात्रा एससीपीएच्या प्रांगणातून बाहेर पडल्यानंतर बाहेर वाट पाहत असलेल्या जनसमुदायातून 'रतन टाटा अमर रहे'च्या घोषणा घुमल्या. समुद्र किनाऱ्यावर थांबलेले नागरिकही अंत्ययात्रेबरोबर चालू लागले. 'वंदे मातरम्', 'भारत माता की जय' अशा घोषणांनी परिसर निनादला.

महापालिकेच्या वरळी येथील माता रमाबाई आंबेडकर स्मशानभूमीत गुरुवारी सायंकाळी ५.३० च्या सुमारास पारशी समुदायाच्या पद्धतीनुसार त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. टाटा यांचे कुटुंबीय, नातेवाईक व अन्य नजीकचे सहकारी अंत्यविधीसाठी स्मशानभूमीत दाखल झाल्यानंतर अंत्यविधी सुरू झाले. जवळपास तासाभराच्या विधींनंतर सायंकाळी ५.३० च्या सुमारास विद्युत दाहिनीत टाटा यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले आणि एका युगाचा अंत झाला.

## जिल्हा परिषद अध्यक्षांच्या निवडणुकीस मुदतवाढ, शाळांना २० टक्के वाढीव अनुदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक तोंडावर आली असून पुढील काही दिवसांमध्ये राज्यात आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील महायुती सरकारने निर्णयांचा धडाका लावला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज (१० ऑक्टोबर) मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील विविध प्रश्नांबाबत चर्चा झाली. याच मंत्रिमंडळ बैठकीत राज्य सरकारने मोठे निर्णय घेतले आहेत. दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज झालेली मंत्रिमंडळाची बैठक महत्वाची समजली जात होती.

राज्यसरकारने आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापतींच्या निवडणुकीस मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच शाळांना २० टक्के वाढीव अनुदानाचा टप्पा देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. याबरोबरच शिंपी, गवळी, लाडशाखीय वाणी-वाणी, लोहार, नाथपंथीय समाजासाठी महामंडळे (इतर मागास बहुजन कल्याण) तयार करण्यात येणार असून पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र महामंडळे करण्याचा निर्णयासह मदरश्यांमधील शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

### राज्य सरकारचे मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोठे निर्णय

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

## नॉन क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा वाढवण्यासाठी राज्याची केंद्राकडे विनंती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ओबीसी आरक्षणाचा लाभ घेण्याकरता महत्त्वाचे असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राबाबत राज्य मंत्रिमंडळात मोठा निर्णय घेण्यात आला आहे. नॉन क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा वाढवण्याची विनंती केंद्र शासनाला करण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे.

शासनाने ओबीसी आरक्षणासाठी वर्गवारी केली आहे. ओबीसींमधील सधन व्यक्तींना आरक्षणातून वगळण्यात आले असून आर्थिक दुर्बल नागरिकांसाठी आरक्षणाची तरतूद केली आहे. ओबीसींमधील सधन गटातील नागरिकांना 'क्रिमिलेअर' तर गरीब घटकाला 'नॉन-क्रिमिलेअर' म्हणून संबोधले आहे. या गटातील व्यक्तींना आरक्षणाचे फायदे मिळवण्यासाठी 'नॉन क्रिमिलेअर' प्रमाणपत्राची गरज असते. त्यासाठी केंद्र सरकारने निकष निश्चित केले आहेत. नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून दिले जाते. ओबीसी आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी किंवा महिला आरक्षणासाठी 'नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र' सादर करावे लागते.

त्यानुसार, राज्य सरकारने मंत्रिमंडळात घेतलेल्या निर्णयानुसार नॉन क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा वाढवण्याची विनंती केंद्र सरकारला करण्यात येणार आहे. उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेल्या नॉन क्रिमिलेअर उत्पन्नाची मर्यादा आठ लाखांवरून पंधरा लाख रुपये इतकी करण्याची शिफारस केंद्र शासनाला करण्यात येणार आहे.

## काश्मीरमध्ये ओमर मुख्यमंत्री; हरियाणात दसऱ्यानंतर निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चंडिगढ/श्रीनगर : नॅशनल कॉन्फरन्स विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी ओमर अब्दुल्ला यांची गुरुवारी निवड करण्यात आली. आता नॅशनल कॉन्फरन्सच्या मित्रपक्षांची शुक्रवारी बैठक होईल. त्यात सरकार स्थापनेची औपचारिकता पूर्ण केली जाईल. तर हरियाणात दसऱ्यानंतरच भाजपचे नवे सरकार सत्तारूढ होईल. मंत्रिमंडळ निवडीत विभाग तसेच जातींचे संतुलन राहावे यासाठी व्यापक चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात आले.



नॅशनल कॉन्फरन्सच्या आमदारांची पक्षाच्या मुख्यालयात बैठक झाली. ९५ सदस्यीय जम्मू-काश्मीर विधानसभेत नॅशनल कॉन्फरन्सला ४२ जागा मिळाल्या आहेत. तर त्यांचे मित्रपक्ष काँग्रेस ६ तर माकपला एक जागा मिळाली.

हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांनी बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांची दिल्लीत भेट घेतली होती. सैनी यांच्याकडेच पुन्हा मुख्यमंत्रीपद सोपवले जाईल अशी चिन्हे आहेत. गुरुवारी सैनी यांनी भाजपचे हरियाणा प्रभारी धर्मेंद्र प्रधान यांची दिल्लीत भेट घेतली. सैनी यांच्याकडे मार्चमध्ये राज्याची धुरा सोपविण्यात आली होती. निवडणूक जिंकल्यास सैनी हेच मुख्यमंत्री असतील असे पक्षाने नमूद केले होते. ९० सदस्यीय हरियाणा विधानसभेत भाजपने ४८ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले.

## तुकडेबंदी कायद्याचा भंग करून झालेले जमीन व्यवहार नियमित, राज्य सरकारचा निर्णय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात तुकडेबंदी कायद्याचा भंग करून ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत झालेले जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार प्रचलित बाजारमूल्याच्या (रेडीरेकनर) ५ टक्के शुल्क आकारून नियमित करण्याचा निर्णय गुरुवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील दोन ते अडीच कोटी लोकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अर्धा एकर पेक्षा कमी बागायती किंवा दोन एकर पेक्षा कमी जिरायती जमीन खरेदी-विक्रीला बंदी घालणारा तसेच एक, दोन गुंठे जमीन खरेदीस प्रतिबंध करणारा महाराष्ट्र धारण जमीनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबतचा सन १९४७चा (तुकडेबंदी) कायदा आता कालबाह्य झाला आहे. या कायद्यांमुळे लोकांची मोठी अडचण होत असून तो रद्दच करावा अशी महत्त्वपूर्ण शिफारस याबाबत गठीत सेवानिवृत्त ज्येष्ठ सनदी अधिकारी उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने राज्य सरकारला केली होती.

जमीन महसुलाच्या अनुषंगाने राज्यातील जुनाट कायद्यांमध्ये कालसुसंगत बदल व सुधारणा सूचविण्यासाठी राज्य सरकारने दांगट यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रकांत दळवी, शेखर गायकवाड आदी सेवानिवृत्त ज्येष्ठ सनदी अधिकाऱ्यांची एक समिती गठीत केली होती. समितीचा हा अहवाल सरकारले स्वीकारला असला तरी तुकडेबंदी कायदा रद्द करण्याच्या प्रक्रियेला विलंब लागणार असल्याने तोवर लोकांना दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. राज्यात तुकडा बंदी कायद्याचे उल्लंघन करून मोठ्याप्रमाणात जमिनीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार झालेले असून अशा व्यवहारांच्या ७-१२ उताऱ्यावर तुकडा बंदी विरुद्ध व्यवहार अशी नोंद करण्यात आल्याने लोकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत झालेले जमीन हस्तांतरण किंवा विभाजन व्यवहार नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पत्रकार संवाद यात्रेचे यशस्वी फलित**

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अक्कलकोट शाखेच्या वतीने प्रदेश अध्यक्ष वसंत मुंडे व सरचिटणीस विश्वासराव अरोटे यांच्या अभिनंदनच ठराव**

## राज्यातील पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची स्थापनेची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई (कमलाकर सोनकांबळे) : महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांचे हक्क आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने आयोजित केलेली पत्रकार संवाद यात्रा अखेर यशस्वी ठरली. या यात्रेची सांगता नुकतीच मुंबई येथील मंत्रालयात झाली, ज्यामध्ये पत्रकारांच्या हितासाठी राज्य सरकारने पत्रकारांच्या दृष्टीने पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या दृष्टीने ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केली, ज्यामुळे या क्षेत्रातील लोकांना आर्थिक स्थैर्य लाभेल.

पत्रकार संवाद यात्रा नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमी येथून सुरू झाली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या नेतृत्वाखाली, संपूर्ण महाराष्ट्रभर पत्रकार बांधवांनी ही यात्रा केली. विविध जिल्ह्यांमधून प्रवास करताना, त्यांनी पत्रकारांच्या समस्या आणि मागण्या मांडण्यासाठी सर्व आमदार, खासदार आणि विरोधी पक्ष नेत्यांशी संवाद साधला. महाराष्ट्रातील पत्रकारांसाठी सुरक्षा, आर्थिक मदत, आणि सामाजिक प्रतिष्ठा यांसारख्या मुद्द्यांवर या यात्रेदरम्यान ठोस चर्चा झाली.

या संवाद यात्रेत पत्रकार बांधवांनी प्रत्येक जिल्ह्यातील राजकीय नेत्यांना निवेदने सादर केली. त्यांनी पत्रकारांवरील हल्ले, कामाच्या कठीण परिस्थितीतील अडचणी आणि आर्थिक समस्यांबद्दल शासनाला सविस्तर माहिती दिली. यासोबतच, पत्रकार संवाद यात्रेच्या विविध पोस्टर्सचे अनावरण देखील करण्यात आले, ज्यात या मुद्द्यांवर अधिक जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.




या संवाद यात्रेचा परिणाम म्हणून, राज्य सरकारने पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या महामंडळाच्या स्थापनेमुळे पत्रकारांना त्यांच्या रोजच्या कामकाजात आर्थिक मदत मिळणार आहे. वृत्तपत्र विक्रेत्यांनाही याचा फायदा होणार असून त्यांच्या व्यवसायाला एक नवीन दिशा मिळेल. पत्रकारांना अधिकृत कर्ज सुविधा, विमा योजनांचा लाभ, विविध सरकारी योजनांचा आधार मिळवून देण्यासाठी या

महामंडळाची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे. या महामंडळामुळे पत्रकारांना त्यांचे हक्क मिळवण्यासाठी आता शासनाकडे मदत मागावी लागणार नाही. पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांना आर्थिक पाठबळ मिळाल्याने त्यांच्या कामात सुसूत्रता आणि स्थैर्य येईल. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष वसंतराव मुंडे, राज्य संघटक संजयराव भोकरे, राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे व कार्याध्यक्ष प्रविण सपकाळे यांनी मोठे योगदान दिले. राज्याचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मंगल प्रभात लोढा आणि आ. पंकजा मुंडे यांसारख्या नेत्यांनी या संवाद यात्रेच्या समारोपाला उपस्थित राहून आपला पाठिंबा दर्शविला. पत्रकार संघाच्या या महत्वपूर्ण यशस्वी संवाद यात्रेमुळे राज्यातील पत्रकार वर्गात आनंदाची लहर पसरली आहे. महायुती सरकारच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. हा निर्णय पत्रकारांच्या हक्कांसाठी उभे राहण्यासाठी एक नवीन आदर्श निर्माण करणारा ठरला आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने सर्व आमदार, खासदार, सर्वपक्षीय नेते, विरोधी पक्ष नेते तसेच सरकारमधील सर्व नेते आणि पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले जात आहे. महायुती सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे पत्रकार वर्गात उत्साह आणि आनंदाचे वातावरण आहे. यशस्वी संवाद आणि समन्वयाच्या दृष्टीने हे पाऊल स्वागतार्ह आहे, ज्यामुळे पत्रकारिता क्षेत्राला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पत्रकार संवाद यात्रेने पत्रकारांचे हक्क आणि समस्या सोडवण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाच्या स्थापनेमुळे पत्रकारांना आता अधिक सुरक्षित आणि आर्थिक स्थिर जीवन मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे. पत्रकार संघाच्या या यशस्वी प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील पत्रकारिता क्षेत्राच्या भविष्याला नवीन दिशा मिळाली आहे, ज्यामुळे पत्रकारांच्या हक्कांच्या लढ्यात हा एक मोठा विजय मानला जात आहे.

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे.. राज्य संघटक संजय भोकरे. राज्य सरचिटणीस डॉ विश्वास आरोटे.कार्यध्यक्ष प्रविण सपकाळे यांच्या नेतृत्वाखालील, दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेचे फलित..झाल्याने अभिनंदन ठराव करून पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र दोन आर्थिक विकास महामंडळाचा मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय झाल्यामुळे महायुती सरकारचे अभिनंदन करण्यात आले.**

**– कमलाकर सोनकांबळे** (तालुकाध्यक्ष महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट)

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### देश हळहळला

यशस्वी उद्योजकाचं उत्तम उदाहरण, परोपकार वृत्ती असणारे दयाळू व्यक्तीमत्त्व, प्राणीमात्रांवर पराकोटीचं प्रेम आणि माणसातलं माणूसपण जपणाऱ्या रतन टाटा अनंतात विलीन झाले. वरळीतील स्मशानभूमीत शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रतन टाटा यांना अखेरचा निरोप देण्याकरता देशभरातील असंख्य लोक मुंबईत दाखल झाले होते. पारशी समाजाच्या विधीनुसार त्यांचावर अंत्यसंस्कार करण्यात आले. विद्युत स्मशानभूमीत त्यांनी अखेरचा निरोप दिला. टाटा यांचे पार्थिव दक्षिण मुंबईतील नरिमन पॉइंट येथील नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (छउझ) येथे गुरुवारी सकाळी साडेदहा ते दुपारी चार या वेळेत अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यानंतर त्यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी वरळीतील स्मशानभूमीत नेण्यात आले. केंद्राच्या वतीने रतन टाटा यांच्या अंत्यसंस्काराला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित होते. अमित शहा, केंद्रीय मंत्री पियुष गोयल आणि इतर मंत्री आणि अंबानींसारखे उच्च उद्योजकही उपस्थित होते. टाटा या नाममुद्रेच्या माध्यमातून भारतीय उद्योग जगताला आधुनिक युगात नेण्यासाठी झटणारे आणि या क्षेत्राचा ठसा आंतरराष्ट्रीय प्रतलावर उमटवणारे द्रष्टे उद्योगपती, दानवीर, टाटा उद्योसमुहाचे माजी अध्यक्ष रतन नवल टाटा यांचं बुधवारी रात्री मुंबईतील रुग्णालयात वृद्धापकाळाने निधन झाले. रतन टाटा गेले काही दिवस आजारी होते. आपल्या प्रकृतीस धोका नसल्याचं त्यांनी सोमवारीच समाजमाध्यमांवर जाहीर केले होते. परंतु, बुधवारी त्यांची प्रकृती खालावली आणि रात्री उशिरा त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाचं वृत्त समजातच समाजमाध्यमांवर अनेकांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेकांनी त्यांच्याप्रती शोक व्यक्त केला. सामान्य नागरिकांसह अनेक दिग्गज लोकांनी रतन टाटांना अखेरचा निरोप देण्याकरता गर्दी केली होती. तसंच, त्यांच्या सावत्र आई सिमोन टाटा याही अंत्यसंस्कारावेळी उपस्थित होत्या.

## श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाने आपण धन्य झालो : युवा उद्योजक सुयश गायकवाड यांचे गौरवोद्गार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : सोलापूर शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सरचिटणीस आणि युवा उद्योजक आणि मैत्री ग्रुपचे संस्थापक वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांचे चिरंजीव सुयश गायकवाड यांनी आज श्री दत्त समर्थ निर्गुणधाम श्री क्षेत्र अक्कलकोट येथे भेट देवून श्री स्वामी समर्थ महाराज यांचे दर्शन घेतले यावेळी श्री दत्त समर्थ निर्गुणधाम चे संस्थापक अध्यक्ष स्वामिनाथ पोतदार यांनी सुयश गायकवाड आणि त्यांच्या सोबत असलेल्या सर्व मान्यवरांचा स्वामींचे कृपावस्त्र देवुनसन्मान केला.

सोलापूरचे येथील राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सरचिटणीस आणि मैत्री ग्रुपचे संस्थापक रावण साम्राज्य सामजिक संस्थेचे कार्याध्यक्ष आणि युवा उद्योजक सुयश गायकवाड साहेब श्री दत्त समर्थांच्या दर्शनास आले असता श्री दत्त समर्थ निर्गुणधाम चे संस्थापक अध्यक्ष स्वामीनाथ पोतदार यांनी त्यांचे श्री दत्त समर्थांचे कृपा वस्त्र श्रींचे प्रतिमा आणि प्रसाद देऊन त्यांचा सन्मान करण्यात आले याप्रसंगी भक्त जन उपस्थित होते.

याप्रसंगी सुयश गायकवाड यांचे सहकारी मित्र अभिषेक डोळसे रोशन वाघमारे, दियेश सावंत, अनिष सातपुते, यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते

या प्रसंगी बोलतांना सुयश गायकवाड यांनी श्री स्वामींच्या दर्शनाने आपण धन्य झालो असे गौरोद्गार काढले.

यावेळी सुयश गायकवाड यांनी अन्नछत्र मंडळात जावून श्री स्वामी समर्थ महाराज यांचे दर्शन घेतले यानंतर त्यांनी ग्रामदैवत हजरत पिर शेख चित्स्ती रह नुरुद्दिन बाबा यांचें ही दर्शन घेतले.

# नेत्रदीपक लाडक्या बहिण सोहळ्याचे यश हे नेटक्या नियोजनाला

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा यशस्वी









राज्य शासनाने १ जुलै २०२४ पासून राज्यातील १८ ते ६० वर्षे वयोगटातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रतिमहा पंधराशे रुपये थेट त्यांच्या बँक खात्यावर देण्यात येत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील १० लाख ७० हजार महिला या योजनेसाठी पात्र ठरल्या असून आज रोजी पर्यंत ७ लाख पेक्षा अधिक महिलांच्या बँक खात्यावर ४८१ कोटी रुपये वितरित झालेले आहेत. त्या अनुषंगाने या योजनेचा वचनपूर्ती सोहळा आयोजित करण्यात आलेला होता. या सोहळ्यास संपूर्ण जिल्ह्यातून ४० हजार पेक्षा अधिक महिला लाभार्थी उपस्थित होत्या. एवढ्या मोठ्या संख्येने लाभार्थी येऊन हा सोहळा भव्य दिव्य तर झालाच परंतु या सोहळ्यात सर्व प्रकारच्या सोयी सुविधा लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या होत्या. तसेच अत्यंत काटेकोरपणे नियोजन करून लाभार्थ्यांना सोहळ्यात येण्यापासून ते जाण्यापर्यंत कोणतीही अडचण निर्माण झालेली नाही.

प्रशासनाने सोहळा ठिकाण ते सर्व लाभार्थ्यांना सुविधा देण्याचे काटेकोरपणे नियोजन केलेले होते. परंतु तीन ते चार वेळेस हा सोहळा रद्द झाला, तो दिनांक ८ ऑक्टोबर २०२४ रोजी माननीय उपमुख्यमंत्री श्री. देवेंद फडणवीस व मा. उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. याची पहिली तारीख आल्यापासून ते सोहळा संपेपर्यंत जिल्हा प्रशासनाचा हा सोहळा यशस्वी करण्यासाठीचा उत्साह अजिबात कमी नव्हता. त्यामुळे हा सोहळा भव्य दिव्य असा झाला असून यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे कुशल नेतृत्व तर महापालिका आयुक्त शितल उगले तेली, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे सहकार्य ही तेवढेच मौलिक ठरले.

कार्यक्रमासाठी योग्य स्थळ–

मुख्यमंत्री कार्यालयातून सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात सोलापूर येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यक्रम घेण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या त्यानुसार जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद त्यांच्या अध्यक्षतेखाली सर्व प्रशासकीय यंत्रणेची बैठक झाली या बैठकीमध्ये या कार्यक्रमासाठी स्थळ निवड करण्यात आली. ४० ते ५० हजार लाभार्थी बसू शकतील अशी व्यवस्था करणे तसेच त्यांना घेऊन येणाऱ्या वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था ही कार्यक्रम ठिकाणापासून साधारणत: एक किलोमीटरच्या अंतरात असावी या अनुषंगाने शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले श्री सिद्धेश्वर मंदिरासमोरील 'होम मैदान' निश्चित करण्यात आले.

कार्यक्रम व्यवस्था–

या सोहळ्यासाठी होम मैदान ही जागा निश्चित झाल्या नंतर त्या ठिकाणी चाळीस हजार महिला लाभार्थी व्यवस्थितपणे बसू शकतील यासाठी भव्य दिव्य असा वॉटरप्रूफ मंडप टाकण्याचे नियोजन करण्यात आले. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी आवश्यक ती कार्यवाही पूर्ण केली. या मंडपात ४० हजार खुर्च्या टाकण्यात आल्या त्या प्रत्येक खुर्चीवर लाभार्थ्यांना पिण्यासाठी पाणी बॉटल देण्यात आली. तसेच मंडपाच्या बाजूलाही हजारोच्या संख्येने जागोजागी पाण्याचे जार ठेवण्याचे नियोजन करण्यात आले. मंडपाच्या तिन्ही बाजूंना सोलापूर महापालिका जिल्ह्यातील विविध नगरपालिका यांच्याकडे असलेले मोबाईल टॉयलेट असे एकूण ४५० मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करण्यात आली. तसेच हे टॉयलेट स्वच्छ करण्यासाठी मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले.

सूक्ष्म नियोजनासाठी ९ बैठका–

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे अत्यंत बारकाईने लक्ष होते. कार्यक्रमाची पहिली तारीख जाहीर झाल्यापासून ते दिनांक ८ ऑक्टोबर २०२४ चा प्रत्यक्ष कार्यक्रम होईपर्यंत च्या कालावधीत जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी ९ बैठका घेतल्या होत्या, त्यामध्ये ६ बैठका दूरदृश्य प्रणाली द्वारे तर ३ बैठका प्रत्यक्ष जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या होत्या. या सर्व बैठकातून या कार्यक्रमाची अत्यंत बारकाईने रूपरेषा ठरविण्यात आली तसेच प्रत्येक विभागाला पहिल्याच बैठकीत दिलेली जबाबदारी ते व्यवस्थितपणे पार पाडतात का नाही यावर निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार ह्या अत्यंत सूक्ष्मपणे लक्ष ठेवून होत्या.

एस. टी. महामंडळाच्या ४३८ बसेसची व्यवस्था – सोलापूर जिल्ह्याच्या अकरा तालुक्यातून एसटी महामंडळाच्या ४३८ बसेस मधून जवळपास २० हजार पेक्षा अधिक महिला लाभार्थी आणण्याचे नियोजन करण्यात आले. नवरात्र महोत्सवात एसटी महामंडळाला मोठ्या प्रमाणावर प्रवासी संख्या असतानाही सोलापूर विभागाने त्यांच्या स्तरावरून या कार्यक्रमासाठी ४३८ बस उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या प्रवाशांनाही कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही या दृष्टीने त्यांनी नियोजन केले.

बसेस मधील सुविधा–

प्रत्येक तालुक्याच्या गावागावांमधून योजनेच्या लाभ मिळालेले लाभार्थी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणारा असल्याने त्यांच्यासाठी बसेसची व्यवस्था करण्यात आलेली होती संबंधित तालुक्याचे तहसीलदार पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आलेली होती. प्रत्येक बस मध्ये लाभार्थ्यांना फूड पॅकेट स्नॅक्स पाणी बॉटल उत्कृष्ट क्वालिटीचे जेवण आधी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल होत्या. त्यामुळे लाभार्थ्यांना कोणताही त्रास होणार नाही यासाठी जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सर्व संबंधित अधिकारी कर्मचारी यांना निर्देशित केले होते.

प्रत्येक बस मध्ये अंगणवाडी सेविका अशा वर्कर तर बसचे नोडल अधिकारी म्हणून तलाठी किंवा ग्रामसेवक यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. कार्यक्रमाच्या एक दिवस अगोदर सर्व संबंधित नोडल अधिकारी यांनी त्यांना ज्या गावातून यायचे आहे त्या गावातून होम मैदान, पार्किंग ते परत त्या गावात असा स्वतः प्रवास करून खात्री केली. प्रत्येक तालुक्यातील बसेसचे नियंत्रण करण्यासाठी तालुकास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापित करून एक नोडल अधिकारी देण्यात आलेला होता त्याचप्रमाणे ११ तालुक्यातील नियंत्रण कक्षाशी समन्वय ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात एक नियंत्रण कक्ष निर्माण करून सर्व तालुका स्तरीय नियंत्रण कक्षाशी समन्वय ठेवला जात होता. त्यामुळे सभा ठिकाणी सर्व महिला लाभार्थी कार्यक्रमाच्या वेळेपूर्वी विराजमान झालेल्या होत्या. हेच जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या कुशल नेतृत्वाचे द्योतक आहे.

गर्दी व वाहतूक व्यवस्थापन–

८ ऑक्टोबर २०२४ रोजी संपूर्ण जिल्हाभरातून ४३८ बसेस २५० खाजगी चार चाकी एक हजार दुचाकी इतकी वाहने सोलापूर शहरात दाखल होणार होती. त्या अनुषंगाने गर्दी व वाहतुकीचे योग्य नियोजन पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त दिपाली काळे, वाहतूक उपायुक्त सुधीर खिरडकर यांनी अत्यंत चोखपणे केले. प्रत्येक तालुक्यातून येणारी वाहने होम मैदान पासून एक ते दोन किलोमीटरच्या अंतरावर पार्किंग व्यवस्था करण्यात आली. संबंधित वाहने होम मैदानाच्या जवळपास येऊन लाभार्थ्यांना कार्यक्रमासाठी सोडून पार्किंग स्थळावर निघून जात होते. त्यामुळे एवढ्या मोठ्या संख्येने सोलापूर शहरात वाहने व नागरिक दाखल होऊनही कुठेही गर्दी दिसून आली नाही तसेच वाहतुकीस कोठेही अडथळा निर्माण झाला नाही हे अत्यंत महत्त्वाचे आहे. व लाभार्थ्यांना घेऊन सोलापूर शहरात दाखल झालेली सर्व वाहने सायंकाळी पाच वाजेपर्यंत आलेल्या ठिकाणी परतीच्या प्रवासाला निघालेली होती. त्याप्रमाणेच होम मैदान परिसरात तसेच सभामंडपात कोणत्याही प्रकारची अडचणी येणार नाही. तसेच कोठेही गर्दी होणार नाही यासाठी शहर पोलीस उपायुक्त दिपाली काळे यांनी पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली गर्दीवर अत्यंत चोखपणे नियंत्रण ठेवले. तसेच यासाठी शेकडो पोलीस अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली होती.

**सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर**

सुरक्षा पासेस–

या कार्यक्रमासाठी अत्यंत सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आलेली होती. या ठिकाणी पत्रकार कक्ष, व्यासपीठावरील पासेस पोलीस विभाग तर व्हीआयपी कक्ष, अन्य पदाधिकारी व सर्व संबंधित अधिकारी यांना सुरक्षा पासेस जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पुरवण्यात आलेले होते. त्यामुळे सुरक्षेवर असलेले पोलीस कर्मचारी पासेसची कसून चौकशी करूनच संबंधितांना आत मध्ये प्रवेश देत होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील सर्व वृत्तपत्र व इलेक्ट्रॉनिक मीडियाचे प्रतिनिधी यांना व्हीआयपी पासेस जिल्हा माहिती कार्यालयाने वितरित केले.

महिला लाभार्थी–

जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभ मिळालेल्या हजारो लाभार्थी तसेच व्यासपीठावर उपस्थित राहणाऱ्या लाभार्थ्यांची निवड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे नेतृत्वाखाली महिला व बालविकास व ग्रामविकास विभागाने केली. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी प्रसाद मिरकले तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे यांनीही हा सोहळा यशस्वी पार पडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली .तसेच सोलापूर महापालिकेच्या वतीने या कार्यक्रमासाठी दहा हजार महिला आणण्याचे नियोजन करण्यात आले होते, त्या अनुषंगाने त्या महिलांना फूड पॅकेट स्नॅक्स, पाणी बॉटल आदी सुविधाही जिल्हा प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या होत्या. महापालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त शितल उगले तेली यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, महापालिका बचत गटाचे समन्वयक समीर मुलांनी यांनी केले.

सांस्कृतिक कार्यक्रम व आरजेचा प्रश्न उत्तर कार्यक्रम–

या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्या महिला लाभार्थ्यांसाठी विविध संस्कृती कार्यक्रमाचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील विविध पारंपारिक गीताने सांस्कृतिक कार्यक्रमाची लज्जत वाढली. यावेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवर आधारित प्रश्न येथे उपस्थित असलेल्या महिला लाभार्थ्यांना विचारण्यात आले. यामुळे कार्यक्रमात रंजकता आली व कार्यक्रम ठिकाणी सुरुवातीला लवकर आलेल्या महिला लाभार्थ्यांचे ही मनोरंजन झाले.

अन्य अधिकाऱ्यांची भूमिका–

उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख यांच्यावर व्यासपीठ व्यवस्थापनाची जबाबदारी देण्यात आली होती. राजशिष्टाचाराप्रमाणे व्यासपीठावर मान्यवर व्यक्तींच्या चेअर व्यवस्थित आहेत का नाही यापासून ते सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून घेण्याबाबतची जबाबदारी त्यांच्यावर होती. जिल्हा नगरपालिका प्रशासन यांच्या वतीने जवळपास साडेचारशे मोबाईल टॉयलेटची व्यवस्था सभामंडप परिसरात तसेच पार्किंगच्या ठिकाणी करण्यात आलेली होती. या व्यवस्थेवर जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी विना पवार यांनी योग्य नियंत्रण ठेवून ही व्यवस्था अत्यंत चांगल्या पद्धतीने सुरू ठेवली होती. रोजगार हमी योजनेच्या उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांनीही या सोहळ्याचे व्यासपीठ सजावट करून घेण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. सभामंडपात येणारे सर्व लाभार्थी तसेच महत्त्वाचे अति महत्त्वाचे व्यक्तींचे जेवण तसेच पत्रकारांसाठी जेवणाची व्यवस्था सभामंडपातील प्रत्येक खुर्चीवर पाणी बॉटल व्यवस्था करण्याचे नियोजन अत्यंत चोखपणे जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी पार पाडले. तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी यांच्याबरोबर सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेली सर्व जबाबदारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या कुशल नेतृत्वाखाली अत्यंत काटेकोरपणे पार पाडली.

दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा सन्मान–

मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण अभियानांतर्गत सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळ्याचे अत्यंत नेट नेटके नियोजन करून हा सोहळा यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडवणीस व उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा सन्मानपत्र देऊन गौरव केला. माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांचा दौरा त्यानंतर माहे एप्रिल ते जून २०२४ या कालावधीत झालेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुका २०२४ तर एक जुलै ते २३ जुलै २०२४ या कालावधीत झालेली आषाढी वारी आणि दिनांक ८ ऑक्टोबर २०२४ रोजी चा लाडकी बहीण वचनपूर्ती सोहळा अशा मोठ्या चार कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी म्हणून पदभार घेतल्यापासून यशस्वी आयोजन केलेले आहे. या सर्व यशस्वी कार्यक्रमातून जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचे कुशल प्रशासकीय नेतृत्वगुण दिसून येत आहेत.

मंगळवार दिनांक ८ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ठीक साडेबारा वाजता उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री श्री अजित पवार यांचे सभा परिसरात आगमन झाले. त्यानंतर रॅम वरून दोन्हीही खूप मुख्यमंत्री व्यासपीठाकडे येत असताना रॅम्पच्या दोन्हीही बाजूला बसलेल्या महिला लाभार्थ्यांनी स्वतः हून शेकडो राख्या बांधल्या. हे संपूर्ण व्यासपीठ सभामंडप अत्यंत नेत्रदीपक पद्धतीने सजवण्यात आलेले होते, तर ४० हजार पेक्षा अधिक महिला लाभार्थी उपस्थित राहिल्याने हा सोहळा अत्यंत भव्य दिव्य तर झालाच परंतु जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या कुशल नेतृत्वाने व नेटक्या नियोजनामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी झालेला आहे. बऱ्याच कालावधीनंतर जिल्हा प्रशासनाने एवढ्या मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम घेऊन तो तेवढ्याच उत्कृष्टपणे पार पाडलेला आहे.

# माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सव २०२४ चे आयोजन

### माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना मेजवानी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**विठ्ठल प्रतिष्ठान आयोजित चेअरमन अभिजीत पाटील यांच्या संकल्पनेतून साकार होणार माढ्यामध्ये सांस्कृतिक महोत्सवाचा थरार**



पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांच्या संकल्पनेतून व विठ्ठल प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या माढा कृषी व संस्कृती महोत्सव २०२४ या दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर सुरू होणाऱ्या या महोत्सवासाठी उभारण्यात येणाऱ्या भव्य शामियाना आणि मंडप पूजन अभिजीत पाटील यांच्या हस्ते पार पडले.

या कार्यक्रमाचे आयोजन रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय सोलापूर रोड माढा येथे करण्यात आले आहे.

शनिवार दिनांक १२ ते बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ या पाच दिवस चालणाऱ्या कृषी व सांस्कृतिक महोत्सवामध्ये कृषी विषयक तज्ञांचे मार्गदर्शन, महाराष्ट्रातील प्रसिद्ध कलाकारांच्या उपस्थितीत संस्कृती कार्यक्रम तसेच साहित्य आणि प्रदर्शन येथील नागरिकांना पाहावयास मिळणार आहे.

या महोत्सवाची सुरुवात शनिवार दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ रोजी दसऱ्याच्या दिवशी सकाळी १० वाजता भव्य शेतकरी मेळाव्याने होणार आहे. या दिवशी दसरा असल्याने सायंकाळी ६ वाजता रावण दहन या कार्यक्रमाचे करण्यात आले आहे. तसेच रविवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता हवामान तज्ञ पंजाबराव डक यांचे मार्गदर्शन, सायंकाळी ६ वाजता अभिनेत्री मानसी नाईक यांचा महाराष्ट्राचे हास्यविर कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. सोमवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता आदर्श सरपंच भास्करराव पेरे-पाटील यांचे मार्गदर्शन तसेच सायंकाळी ६ वाजता ह.भ.प निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या कीर्तन व भारुड कार्यक्रम होणार आहे. तसेच मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता नफ्यातील दुग्ध व्यवसाय या विषयावर गंगाप्रसाद पाटील यांचे मार्गदर्शन आणि सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्राचे कॉमेडी कलाकार भाऊ कदम व मकरंद अनासपुरे यांच्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाचा आनंद नागरिकांना घेता येणार आहे. तसेच कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता अरुण देशमुख कृषी विद्या विभाग प्रमुख यांचे मार्गदर्शन व सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्राचा महागायक आनंद शिंदे यांचा लोकगीताचा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांचा लाभ येथील नागरिकांनी घ्यावा. असे आवाहन चेअरमन अभिजीत पाटील यांनी केले आहे.

यावेळी प्राचार्य सुनील हेळकर सर, अनिलकाका देशमुख मानेगाव, आबासाहेब साठे, ऋषीकाका तंबिले, अक्षय शिंदे, जितु जमदाडे,स्वाभिमान कदम उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### सोलापूर जिल्ह्याला ज्वारी पिकाचे ८५ हजार मिनिकिट उपलब्ध

सोलापूर (जिमाका) : अन्न आणि पोषण सुरक्षा अभियान – पौष्टिक तृणधान्य सन २०२४–२५ अंतर्गत रब्बी हंगामात ज्वारी पिकाचे मिनिकिट या बाबीचे नियोजन करण्यात आलेले आहे. या करीता चालू वर्षी ज्वारी पिकाचे मिनिकिट ४ किलो प्रति मिनिकिट पॅकींग साईजमध्ये लक्षांक प्राप्त आहे.

ज्वारी मिनिकिटसाठी एका शेतकऱ्याला आवश्यक असणाऱ्या बियाणांचे ४ किलो प्रमाणे एक मिनिकिट लाभ देय असणार आहे. सोलापुर जिल्हयासाठी ८५ हजार ८८० मिनिकिट लक्षांक असुन त्यासाठी ३४३५.२० क्विंटल बियाणे उपलब्ध होणार असुन शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि अधिकारी, कृषि सहाय्यक यांच्याशी संपर्क साधुन बियाणे उपलब्ध करून घ्यावे. हे बियाणे तालुकास्तरावर उपलब्ध होणार आहे. यामध्ये फुले सुचित्रा व परभणी सुपर मोती या वाणांचा समावेश आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी प्रमाणीत बियाणे घटकाचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

### सैनिकी मुलांचे वसतिगृह येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावरील पदाची भरती

सोलापूर (जिमाका) : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखालील सैनिकी मुलांचे वसतिगृह, सोलापूर येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर माळी–०१ पद भरावयाचे आहे.

माळी पदाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल. मानधन रूपये १३०८९/– प्रतिमहा असेल. माळी पद हे माजी सैनिक प्रवर्गातून भरावयाची असून सोलापूर जिल्हयातील माजी सैनिक यांनी आपले अर्ज सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रत्यक्ष या कार्यालयात सादर करावे व सदर पदाकरिता त्याच दिवशी मुलाखती घेण्यात येतील. तरी उमेदवारांनी स्वत:ची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. सदर पद भरतीसाठी माजी सैनिकांना प्राधान्य देण्यात येईल. माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास नागरी जीवनातील उमेदवारांचा विचार केला जाईल. तरी सोलापूर जिल्हयातील पात्र व गरजू माजी सैनिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

# विकासकामाची जाण असणाऱ्या आचेगावकरांचे हे प्रेम कदापी विसरणार नाही : आ. सचिन कल्याणशेट्टी

## आचेगाव ते हंजगी रस्त्याच्या डांबरीकरणाचे भूमिपूजन; विविध विकास कामांचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आचेगांव/प्रतिनिधी : आचेगांव तालुका दक्षिण सोलापूर येथे आज आचेगाव ते हंजगी या दोन कोटी ८४ लाख रस्त्याच्या डांबरीकरणाच्या भूमिपूजन व गावातील विविध अनेक विकास कामाची भूमिपूजन व लोकार्पण सोहळाप्रसंगी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते संपन्न झाले, यावेळी बोलताना आमदार कल्याणशेट्टी यांनी विकासकामाची जाण असणाऱ्या आचेगावकरांचे हे प्रेम कदापी विसरणार नसल्याचे सांगितले.

**बलवान गोतसुर्वे यांनी घेतला माजी गृहराज्यमंत्री यांचा खुरपूस समाचार अक्कलकोट पंचायत समिती आवारात माजी गृहराज्यमंत्री मतदारसंघांचे प्रतिनिधित्व केलेले जबाबदार व्यक्तीनी पंचायत समिती सर्वाना कोंडून जाळून टाकेन, होऊन काय माझ्यावर २५वर्ष केस चालेल आणि आमचे आयुष्य ह्यातच गेल्याचे विधान केले होते. ह्यास उत्तर देताना बलवान गोतसुर्वे यांनी मतदारसंघाला सुसंकृतपणा हवा आहे, असे गुंडशाहीचे, दादागिरीनी युवा पिढीचे माथी भडकाऊन त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याच्या राजकारणाला जनता कंटाळली असल्याचे सांगितले.**

एखादा लोकप्रतिनिधी आपल्या भागाचा विकास करत असला तर त्याला ते शंभर वेळा सांगावं लागत असतं पण आचेगावकर हे या पंचवार्षिक मध्ये झालेल्या ३५ कोटीहुन अधिक विकासकामे आचेगावच्या इतिहासात प्रथमच झाल्याचे सांगून लोकप्रतिनिधीच्या पाठीशी खंबीर उभे राहण्याचे आश्वासन देत आहेत , त्यामुळे एखाद्या लोकप्रतिनिधीला ह्यापेक्षा काय हवं असल्याचे कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

यावेळी मंचावर युवा नेते महेश बिराजदार, दत्तात्रय पाटील, माजी सरपंच रमेश शिरसागर, विद्यमान सरपंच विश्रांती पाटील, भाजप जिल्हा अनुसूचित जाती सरचिटणीस बलवान गोतसुर्वे, शिवानंद आंदोडगी, उपसरपंच रफिक मुल्ला, प्यारन मुल्ला,मलकप्पा कोडले,तंटामुक्त अध्यक्ष शावरसिद्ध पाटील,अनिल बर्वे, श्रीशैल माळी,हुसेन पटेल, सागर कोळी, मलकारी कोरे, शिलेप्पा घुंगरगांवकर, चंदू शिलेणी, रायप्पा पुजारी, कुलदीप पाटील, सुरेश मोची सर्व ग्रामपंचायत सदस्य व सदस्या उपस्थित होते.

आपल्या प्रस्ताविकात बोलताना बलवान गोतसुर्वे यांनी आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्यामुळे आजचा दिवस हा सुवर्णअक्षरांनी लिहिण्यासारखा दिवस असून आचेगावच्या इतिहासात ७५ वर्षाच्या कालावधीमध्ये शंभरपटीपेक्षा जास्त विकासकामे आमदार कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून झाल्याचे सांगितले यात प्रामुख्याने आचेगांव ते इंगळगी डांबरीकरण ३ कोटी, जलजीवन मिशन पाणीपुरवठा १कोटी २ लक्ष, तिलाटी गेट ते आचेगांव वळसंग रस्ता राष्ट्रीय महामार्गकडे वळवून १२ कोटी निधी मंजूर करून काम पूर्ण केले, आता आचेगांव हंजगी रस्ता मंजूर झाल्याने व काम ही चालू झाल्याने दोन्ही गांवच्या शेतकऱ्यांसह आर्थिक बाजारपेठाच्या दृष्टीनी मोठा फायदा होणार आहे त्याचबरोबर श्री शावरसिद्ध देवस्थानास राज्यस्तरीय 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन दोन कोटी बरोबरच गांव अंतर्गत सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉक, स्मशानभूमी, सभामंडप, पाणीपुरवठा सोय, विद्युत्तीकरण या सारख्या कामास ३–४ कोटीचा विकास निधी असे तब्बल पंचवार्षिक मध्ये तब्बल ३५ कोटी मिळाल्याचे सांगितले.



विकास कामाबरोबरच आपल्या भावी पिढीला चांगलं संस्कृत जीवनमान जगण्याच्या दृष्टिकोनातून दादागिरी,गुंडगिरी यापासून दूर आमदार कल्याणशेट्टी यांच्या सारख्या स्व संस्कृत व्यक्तिमत्त्वाच्या पाठीशी उभे राहणे हे काळाची गरज असल्याचे सांगितले.युवा नेते महेश बिराजदार यांनी सुद्धा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या कामाची व काम करण्याच्या पद्धत तळागाळातील लोकांपर्यंत कसे पोहोचेल अशा पद्धतीचे असल्याचे सांगितले. या प्रसंगी दत्तात्रय पाटील, विश्रांती पाटील,सागर कोळी, चंदू शिलानी,शिलीसिद्ध घुंगरगावंकर आदिनी मनोगत व्यक्त करून आ. कल्याणशेट्टी यांच्या पाठीशी उभे राहून गांवातुन एकतर्फी मताधिक्य देऊ असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अमोगसिद्ध पाटील सर यांनी केले . यावेळी बहुसंख्येने गावातील नागरिक, भाजप कार्यकर्ते, मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## स्वेरीत स्व.रतन टाटा यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारताचे थोर उद्योगपती रतन टाटा यांचे काल दि. ०९/१०/२०२४ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झाले. भारताची आन, बान आणि शान असणार्या रतन टाटा यांच्या निधनाने भारतीय उद्योग जगतात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. कितीही मोठे झाले तरी पाय जमिनीवर ठेवून माणसाने कसे जगावे याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे रतन टाटा हे आहेत. त्यांच्या निधनाने उद्योगक्षेत्रात व संपूर्ण भारतात हळहळ व्यक्त केली जात आहे.

गोपाळपूर, ता. पंढरपूर येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च इन्स्टिटयूटच्या वतीने स्व. रतन टाटा यांना आज भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी सुरुवातीला स्व. रतन टाटा यांच्या प्रतिमेला स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी स्व.रतन टाटा यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकताना स्वेरी अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर म्हणाले की, 'रतनजी टाटा यांच्या निधनामुळे भारतीय समाजजीवनात व उद्योग जगतात फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर असे दोन्ही काळ अनुभवलेले व भारतीय समाजाच्या उन्नतीमध्ये उद्योगांचे महत्व अधोरेखित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले स्व. रतन टाटा हे बहुधा एकमेव उद्योजक होते. कोविड काळात स्व. रतनजी टाटा यांच्या नेतृत्वाखाली टाटा उद्योग समूहाने केलेले समाजोपयोगी कार्य भारतीय समाज कधीही विसरू शकणार नाही.' यानंतर दोन मिनिटे शांतता पाळून सर्व उपस्थितांनी स्व. रतन टाटा यांना श्रध्दांजली वाहिली. यावेळी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, स्वेरीचे कॅम्पस इन चार्ज डॉ. एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, रजिस्ट्रार राजेंद्र झरकर, पालक व विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## भारतीय बौद्ध महासभेच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी कमलाकर कांबळे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : The Buddhist Society Of India तथा भारतीय बौद्ध महासभा संस्थापक – बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेले संस्थेच्या राष्ट्रीय अध्यक्ष– राजरत्नजी आंबेडकर यांच्या आदेशानुसार भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्ष राजश्री गायकवाड यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (१९५६) जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यामुळे भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष हे पद रिक्त झाले होते.

त्यांच्या जागी भारतीय बौद्ध महासभेच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी आयु मेजर कमलाकर कांबळे यांची निवड करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दिनेशजी हनुमंते तसेच महाराष्ट्र प्रदेश महासचिव वैभवजी दबडगे यांची प्रमुख उपस्थितीमध्ये नियुक्तीपत्र देण्यात आले.



यावेळी सर्व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा कोषाध्यक्ष आयु.रविंद्र कांबळे, शहराध्यक्ष आयु.सुनिल वडवे, समता सैनिक दलाचे केरबा जाधव व कदम सर , सोणावने सर, मोहोळ तालुका उपाध्यक्ष ऋषिकेश सुतकर, अक्कलकोट कमिटी पदाधिकारी राजकुमार बनसोडे श्रीशैल शिवशरण , अमोल शिवशरण , पंढरपुरचे तालुकाध्यक्ष राज वाघमारे असे सर्वजण उपस्थित होते.

## रेल्वेमध्ये अधिस्वीकृती धारक पत्रकारांना दिली जाणारी सवलत पूर्वीप्रमाणे चालू करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : आधीस्वीकृती धारक पत्रकारांना रेल्वे प्रवासात दिली जाणारी पन्नास टक्के सवलत पूर्वीप्रमाणे चालू करा अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे अधिस्वीकृती धारक पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीशैल चिंचोळीकर व सोलापूर वृत्तपत्र पत्रकार संघाचे अध्यक्ष विष्णु कारमपुरी महाराज यांनी केली आहे.



या संदर्भातले निवेदन खासदार प्रणिती शिंदे यांना सोलापूर येथे उपाध्यक्ष विश्वनाथ व्हनकोरे कार्याध्यक्ष विजयकुमार जुंजा व शहर अध्यक्ष सुदर्शन तेलंग यांनी प्रत्यक्ष दिले. आधिस्वीकृतीधारक पत्रकारांना रेल्वे प्रवासात ५० टक्के सवलत दिली जात होती मात्र कोरोना काळापासून ही सवलत केंद्र सरकारने बंद केली आहे तरी पत्रकारांना रेल्वे प्रवासात दिली जाणारी ५०% प्रवास सवलत ही पूर्वीप्रमाणे चालू करावी अशी मागणी करणारा ठराव सोलापूर येथे अधिस्वीकृती धारक पत्रकार संघटनेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत संमत करण्यात आला होता. केंद्रीय पातळीवरून या प्रश्नाचा पाठपुरावा करण्यात येत असून ही खासदार प्रणिती शिंदे यांना निवेदन देऊन पत्रकारांना दिली जाणारी रेल्वे प्रवासात ५० टक्के सवलत पूर्वीप्रमाणे देण्यात यावी अशी मागणी करणारे निवेदन खासदार प्रणिती शिंदे यांना देण्यात आले आहे.

**अधिस्वीकृती धारक पत्रकार संघाची मागणी**

लवकरच याबाबतचा विषय संसदेत मांडण्यात येईल असे खासदार प्रणिती शिंदे यांनी बोलताना सांगितले.

## अनिल सावंत यांनी आयोजित केलेल्या दांडिया महोत्सवाची मोठ्या प्रमाणात चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : भारत उद्योग समूहाचे वाय चेअरमन अनिल सावंत यांनी दिनांक ९ ऑक्टोबर दांडिया उत्सवाचे आयोजन श्री संत तनपुरे महाराज मठामध्ये करण्यात आले होते. गेले दीड महिन्यापासून भैरवनाथ साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन अनिल सावंत यांच्याकडून महिलांना हक्काचे वैशिष्ट्ये मिळावे. महिलांचा सामाजिक कार्यक्रमाला अधिक अधिक सहभाग असावा. यासाठी सातत्याने गेल्या दीड महिन्यापासून खेळ पैठणीचा एक खेळण्याची आयोजन केले जात आहे.

नवरात्र उत्सवानिमित्त आता पुन्हा एकदा महिलांसाठी दांडिया खेळाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाची सुरुवात भावी आमदार अनिल सावंत पत्नी सौ शैलेजा सावंत यांच्या हस्ते दीप प्रज्ञानाने झाले कार्यक्रमाची प्रास्ताविक व आभार एन आय टी कॉम्प्युटरची संचालक श्याम गव्हाळी सर यांनी केले प्रास्ताविक करताना श्याम बाबा विसर यांनी केले. उपस्थितीत महिलांनी बोलताना अनिल सावंत म्हणाले की सर्वप्रथम उपस्थित सर्व महिलांना नवरात्रीच्या मी शुभेच्छा देतो मला माहिती आहे तुम्हाला माझा भाषण ऐकण्यात अजिबात इंटरेस्ट नाही पण तुमचे लक्ष दांडिया खेळण्यावर आहे परंतु समाजाची




तुमचं असणारे महत्त्व तुम्ही ओळखणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती म्हणून डॉक्टर धीरजच्या एनआयटी कॉम्प्युटरची संचालक श्याम गोगावे सर स्वागत कदम समाधान जाधव गुरु ठिगळे आणि भैरवनाथ उद्योग समूहाचे पदाधिकारी कर्मचारी उपस्थित होते

कार्यक्रमाचे इस्टेट मॅनेजमेंट फारुख काझी यांनी केले हर्ष डिजिटल चे गणेश घोडके आणि ॲडव्हर्टाईस चे अनिकेत मेटकरी व आनंद तनपुरे यांचेही विशेष सहकार्य लाभले होते एलईडी टीव्ही ओव्हन, मिक्सर, सायकल साऊंड बाराशे अनेक आकर्षक १८ बक्षिसे ठेवण्यात आली होती. या स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस एलईडी टीव्ही मिक्सर गुप्ता यांना मिळाली दांडिया खेळातून १८ विजेते स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले. अनिल सावंत आणि पत्नी शैलेजा सावंत यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**हर्षवर्धन पाटलांच्या प्रवेशा मुळे निष्ठावंत नाराज**

**प्रविण भैय्या माने**

# इंदापूरच्या जनतेला तिसरा पर्याय देणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटामध्ये प्रवेश केलेल्या हर्षवर्धन पाटील यांचा पक्षप्रवेश शरद पवारांसाठी डोकेदुःखी ठरण्याची शक्यता आहे. हर्षवर्धन पाटील यांच्या पक्षप्रवेशाला राष्ट्रवादीतील इंदापूरच्या काही स्थानिक नेत्यांनी स्पष्ट विरोध केला आहे .

इंदापूरमध्ये शरद पवारांच्या उपस्थितीत हर्षवर्धन पाटील यांनी पक्षप्रवेश करताच, त्याच मैदानावर (शुक्रवारी दि. ११) रोजी मेळाव्याचं आयोजन करत तालुक्यात तिसरी आघाडी तयार करुन हर्षवर्धन पाटील यांना मोठे आव्हान युवा नेते, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीणभैया माने यांनी उभे केल्याचे जाहीर करत पत्रकार परिषद घेतली.

मागील दोन दिवसांपुर्वी इंदापूर येथील जुन्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर माजी मंत्री यांचा शरदचंद्र पवार गटात शरद पवार यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश पार पडला. या पक्ष प्रवेशास विरोध दर्शवत पुणे जिल्हा बँकेचे संचालक अप्पासाहेब जगदाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण माने व कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन भरत शहा या शरद पवार गटाच्या प्रमुख नेत्यांनी शहरातील सोनाई पॅलेस याठिकाणी पत्रकार परिषदेत तिसरी आघाडीची संकल्पना स्पष्ट केली.

प्रवीण माने म्हणाले की, पक्षात मी आणि अप्पासाहेब जगदाळेंसह अनेकजण आगामी विधानसभा निवडणुकांसाठी इच्छुक होतो.

याबाबत आम्ही साहेबांना देखील सांगितले होते की, जे पक्षात आहेत त्यांना उमेदवारी द्या. मात्र, आज इंदापूरमध्ये हर्षवर्धन पाटील यांचा पक्षप्रवेश झाला, त्यांची उमेदवारी देखील जाहीर झाली. त्यामुळे, कार्यकत्यांनी एकत्र बसून निर्णय घेतला पाहिजे, तिसरी आघाडी पर्याय द्यावा अशी कार्यकत्यांची मागणी आहे. लोकांना तिसरा पर्याय दिला पाहिजे, त्यामुळे आम्ही जनतेच्या कोर्टात जाणार असल्याचे सांगितले.

अप्पासाहेब जगदाळे म्हणाले, मीच उमेदवार म्हणून हे सगळं चाललं होतं, अन्याय किती असावा? २०१४ ला मला असेच आश्वासन दिले होते. २०१९ ला आम्ही निर्णय घेतला, आज ज्यांचा पक्षप्रवेश झाला त्यांनी मला मोहिते पाटील यांच्या घरी बोलावून शब्द दिला आणि सांगितले होते की, २०२४ ला तुम्हीच. त्यामुळे, आता जनता हसायला लागली आहे. माझ्यावर आणि प्रवीण मानेंवर । आमच्या वर अन्याय झाला असल्याचे जगदाळे यांनी सांगितले.

आम्ही लोकसभेला काम केलं, आता लोकांना विचारून काम करू. आज लोकं म्हणतात आजी माजी नको तरी पण त्यांनाच बोलावून घेतात.

आजपर्यंत कधी कुणाकडून रुपया घेतला नाही तरी माझ्यावर अन्याय का? किती दिवस अन्याय सहन करायचा? असा सवालही अप्पासाहेब जगदाळे यांनी उपस्थित केला.

भरत शहा म्हणाले की, मी कार्यक्रमाला येणार नव्हतोच, मी ताईंना आधीच सांगितले होतं, ताईंना सदिच्छा भेट दिली.

आम्हाला वेगळा पर्याय शोधायाचा होता, पण तोच पर्याय पुढं आल्याने आम्हाला वेगळा विचार करावा लागेल असे भरत शहा यांनी म्हटले.

या आयोजित पत्रकार परिषदेत सोनाई परिवाराचे अध्यक्ष दशरथ माने, विकास खिलारे यांसह शरदचंद्र पवार गटाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.

## थोडक्यात...

### केतन उर्फ बाबा देवी याच्यासह सिद्राम वाघमारे दोघे दोन वर्षाकरिता तडीपार

सोलापूर (प्रतिनिधी) सन २०२३ व २०२४ सर्वसामान्य नागरिकांना दम दाटी,शिवीगाळ करून मारहाण करणे, बेकायदेशी मंडळी जमा करून दंगा करत महिलांची छेडछाड करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने केतन उर्फ बाबा नारायण देवी (वय-३२,रा.सिद्धेश्वर हॉस्पिटल शेजारी, एसटी स्टँड जवळ,जुना पुना नाका) याला सोलापूर आणि धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार केले आहे. तसेच सिद्राम बसप्पा वाघमारे (वय-३५,रा. कोनापुरे चाळ,रेल्वे लाईन,सध्या दुर्गा माता मंदिर जवळ जगजीवनराम झोपडपट्टी मोदी) यांच्याविरुद्ध सन २०२३ या कालावधीमध्ये सामान्य नागरिकांची फसवणूक करणे,मोटारसायकल चोरी करणे,यासारखे गुन्हे दाखल असून,याला देखील सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार केले आहे. केतन उर्फ बाबा देवी याच्याविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत व सिद्राम वाघमारे याच्याविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

# मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचेही टेंडर निघाले

## योजनेवर बोलणाऱ्या विरोधकांची बोलती बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/प्रतिनिधी : गेल्या अनेक वर्षापासून राजकारणाचा मुद्दा ठरलेली मंगळवेढा उपसा सिंचन योजनेला आमदार समाधान आवताडे यांनी पाठपुरावा करून १३ मार्च २४ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मंजुरी मिळवली होती त्यानंतर पहिल्या टप्प्यातील १११ कोटीचे टेंडर निघून सात ऑक्टोबर रोजी देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या कामाचा कार्यारंभ करण्यात आला आहे यावरही निवडणुकीच्या तोंडावर हे स्टंटबाजी सुरू असल्याचे काही विरोधकांकडून म्हटले जात असताना कार्यक्रमानंतर आ समाधान आवताडे यांनी दोन दिवस मुंबईत देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर ठाण मांडून दुसऱ्या टप्प्याचे टेंडर ही काढले आहे या योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे ७८ कोटी ४३ लाखाचे टेंडर काल दि १० ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झाले असून निविदा मागवण्यात आल्या आहेत त्यामुळे दिवसेंदिवस या योजनेवर बोलणाऱ्या विरोधकांची बोलती बंद होत चालली आहे .

मंगळवेढा उपसा सिंचन योजनेला मार्च महिन्यात मंजुरी दिल्यानंतर अगोदर दोन वेळा मंजुरी मिळाली आहे,हे केवळ राजकारणासाठी लोकसभेच्या तोंडावर मंजुरी देऊन लोकांना दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे अशा टीका विरोधकांनी केल्या मात्र मंजुरीनंतर दुसऱ्याच दिवशी टेंडर पब्लिश झाल्यामुळे विरोधकांना चपराक बसली होती त्यानंतर पहिल्या टप्प्याच्या टेंडर नंतर आमदार समाधान आवताडे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या योजनेच्या शुभारंभासाठी मंगळवेढ्यात बोलवत धुमधडाक्यात या योजनेचा शुभारंभ करून कामास सुरुवात केली आहे.पहिल्या टप्प्याच्या कामाला सुरुवात होते न होते तोच दुसऱ्या टप्प्यातील कामाचेही टेंडर निघाले असून ही योजना युद्ध पातळीवर पूर्ण करण्याचा चंग आमदार समाधान आवताडे यांनी बांधला असल्याचे यावरून दिसून येत आहे.

६९७.५१ कोटीच्या मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या या कामामध्ये दुसऱ्या टप्प्यात पंपगृह टप्पा दोन,संरक्षक भिंत, बॅलन्सिंग टँक, उर्ध्वगामी नलिका दोन लेंडवे चिंचाळे, मुख्य गुरुत्वीय नलिका व त्यावरील वितरण व्यवस्थेचे काम, तसेच योजना कार्यान्वितीकरण करणे, पाच वर्षे परिचलन,देखभाल व दुरुस्ती करून शेतकऱ्यांना प्रशिक्षणासह सर्व वितरण व्यवस्थेचे पाणी वापर संस्था स्थापन करून सर्व वितरण व्यवस्था हस्तांतरण करणे या बाबी दुसऱ्या टप्प्यातील टेंडर मध्ये नमूद करण्यात आले आहेत दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ ते २८ ऑक्टोबर २०२४ या कालावधीमध्ये शासनाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने निविदा मागवण्यात आल्या आहेत तर दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ रोजी या निविदा उघडण्यात येणार आहेत या निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता उजनी कालवा विभाग क्रमांक नऊ मंगळवेढा यांनी राखून ठेवलेला आहे. मंगळवेढा तालुक्यातील जनतेला ही योजना वर्षानुवर्षे राजकारणाचा मुद्दा ठरल्याने मृगजळ वाटत होती मात्र आमदार समाधान आवताडे यांनी पाठपुरावा करत या योजनेचे काम सुरू केल्याने येथील शेतकऱ्यांना आपल्या शेतात मंगळा उपसा सिंचन योजनेचे पाणी येईल अशी आशा वाटू लागली आहे.

**२००९ च्या लोकसभेवर बहिष्कार टाकून दुष्काळी ३५ गावचा पाणीप्रश्न आम्ही चव्हाट्यावर आणला त्यानंतर सातत्याने आंदोलने करून सतत त्या-त्या लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधून घेतले आ समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांने पहिल्या टप्प्यातील कार्यारंभ व दुसऱ्या टप्प्याची निघालेली निविदा हे या दुष्काळी भागासाठी फार मोठा दिलासा देणाऱ्या घटना आहेत या योजनेच्या लाभक्षेत्रातील सर्व क्षेत्राला शंभर टक्के ठिबक सिंचन,प्रत्येक शेतकऱ्याला सोलर पंप व शेततळे शासनाने विशेष योजना राबवून देण्यासंदर्भात पायलट प्रोजेक्ट राबविण्याची मागणी आम्ही करणार आहे.**

**अंकुश पडवळे कृषीभूषण शेतकरी खुपसंगी**

# अक्कलकोट लिंगायत पंचमसाली समाज संघटनेची स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : लिंगायत पंचमसाली समाज संघटनेची स्थापना अक्कलकोट येथे करण्यात आली, समाज संघटनेच्या स्थापनेसाठी ची बैठक आज शासकीय विश्रामगृह येथे निमंत्रक आनंद बुक्कानवरे व बाबासाहेब पाटील यांनी बोलवली होती.

या बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली पंचमसाली समाजाचा प्रगतीसाठी आणि विकासासाठी ही संघटना काम करेल, समाजचा सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक हित जोपासण्याचे काम ही संघटना करेल. बैठकीमध्ये सामुदायिक विवाह, समाजातील गरीब विद्यार्थिनींना शैक्षणिक मदत, कायदेशीर मदत, यासारख्या गोष्टींवर चर्चा झाली, कुठल्याही राजकीय पक्ष किंवा कुठल्याही राजकीय नेत्याला संघटना बांधील राहणार नसल्याचं बैठकीत निमंत्रकांनी सांगितले. समाज संघटित करून त्यातून नेतृत्व निर्माण करण्याच्या दृष्टीने काम करू असे सर्व बैठकीतील मान्यवरांनी आपले मत मांडले, बैठकीला व्हिडिओ कॉल द्वारे श्री. जय मृत्युंजय पंचमसाली जगद्गुरु यांनी अमृतवचन व्यक्त केले. सदर संघटनेचे निमंत्रक व प्रमुख मान्यवर हे गावोगावी समाज संघटनेसाठी बैठका घेणार व पुढील बैठकीत पदाधिकारी निवड करायचे ठरले.



सदर बैठकीला निमंत्रक आनंद बुक्कानवरे, निमंत्रक बाबासाहेब पाटील, विश्वनाथ भरमशेट्टी, शिवसिद्ध बुळा, रवि वरनाळे,शिवानंद पाटील, लक्ष्मीपुत्र बिराजदार, मल्लिनाथ भासगी, नरेंद्र पाटील, शांतिवीर कळसगोंडा, विनायक प्रचंडे, मल्लिनाथ नागशेट्टी, म्हंतेश हत्तुरे, मल्लिनाथ अरवतकल, विष्णू येळमेली, चिदानंद परमशेट्टी, देवेंद्र जकापुरे, विनीत पाटील,शरण ढेपे, ओंकार बिराजदार, रतन बिराजदार, विरेश धनशेट्टी, शिवशरण इचगे, शिवानंद बिराजदार यांचा सह समाजबांधव मोठा संख्येने उपस्थित होते..

# श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक श्री महालक्ष्मी माता पोशाखसह अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दुपारी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे सातव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस महालक्ष्मी पोशाख परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.



श्री विठ्ठलास नक्षी टोप प्रभावळ सह, कौस्तुभ मणी, दंडपेठया जोड, हिऱ्याचा कंगन जोड, मोत्याची कंटी एक पदरी,मोत्याची कंटी दोन पदरी, मारवाडी पेठयाच मोत्यांचा हार, मोत्यांचा तुरा, मस्त्य जोड, तुळशीची माळ, तोडे जोड, बाजीराव कंठी, चांदीचा कस्त्य. इ.

तसेच ❋रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, जडपाचा हार, बाजूबंद जोड, खड्याची वेणी, पाचूची गरसोळी, चिंचपेटी हिरवी, कोल्हापुरी साज, मद्रासी कंठा, ठुशी, सोन्या मोत्याचे तारवड जोड, बाजीराव गरसोळी, खड्यांची बिंदी, मळ्यामोत्याच्या पाटल्या जोड, सोन्याचे बाजूबंद जोड, मस्य जोड, रूळ जोड, पैंजण जोड, मोठी नथ, कर्ण फुले जोड, ठुशी नवीन, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, चंद्रहार, अष्टपैलू मण्यांची कंठी, चंद्रहार मोठा, गोल मण्यांची कंठी, सूर्य इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच राधिका मातेस चांदीचा मुकुट, पुतळ्याची माळ, हायकोल, जवेच्या माळा, मोत्याचा कंठा व ❋सत्यभामादेवीला मुकुट, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, पुतळ्यांच्या माळा, जवेची, माळ इत्यादी अलंकार व प्रथा परंपरेप्रमाणे पोशाख परिधान करण्यात आलेले आहेत. तसेच मंदिर समितीच्या अखत्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

# डी.फार्मसी प्रथम वर्ष प्रवेशाचा कॅप राऊंड-१ येत्या शनिवार पासून सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित डी.फार्मसी (डिप्लोमा) महाविद्यालयात प्रथम वर्ष प्रवेश प्रकियेची पहिली फेरी (फर्स्ट कॅप राऊंड) येत्या शनिवार दि. १२ ऑक्टोबर २०२४ पासून सुरु होणार असून ती सोमवार, दि. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालणार आहे. स्वेरीच्या फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी.क्रमांक ६५०५) मध्ये कॅप राउंड १ साठी ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची सोय केली आहे. स्वेरीच्या पहिल्या डिप्लोमा फार्मसी महाविद्यालयाला प्रचंड गर्दी होत असल्यामुळे आणि पालकांच्या मागणीनुसार मागील दोन वर्षापासून अर्थात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून स्वेरी अंतर्गत असलेल्या बी. फार्मसी महाविद्यालयांतर्गत ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेने नवीन डी. फार्मसीच्या अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याचा डी.टी.इ. कोड ६३९७ असा आहे. याठिकाणी देखील कॅप राउंड १ चे ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची सोय करण्यात आली आहे,' अशी माहीती श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट,पंढरपूरचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली.

**१४ ऑक्टोबर पर्यंत चालणार ही प्रक्रिया**



शनिवार, दि. १२ ऑक्टोबर पासून ते सोमवार, दि.१४ ऑक्टोबर पर्यंत प्रवेशाची पहिली फेरी (कॅप राउंड-१) चालणार आहे. ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना या पहिल्या फेरीचा लाभ घेता येणार आहे. डी. फार्मसी प्रवेशाच्या पहिल्या फेरीची अलॉटमेंट यादी महाराष्ट्र शासनाच्या तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य (डी.टी.इ.) कक्षाच्या संकेतस्थळावर बुधवार, दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध होणार आहे. पहिल्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची स्विकृती गुरुवार, दि. १७ ऑक्टोबर ते रविवार, दि.२० ऑक्टोबर या दरम्यान करता येणार आहे. प्रथम वर्ष डी.फार्मसीच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी प्रा. एस.व्ही मांडवे (मोबा.क्र. ८६६८६३४८७०), प्रा. वृणाल मोरे (मोबा.क्र. ९६६५१९६६६६) प्रा. एस.व्ही कौलगी (मोबा.क्र.७०५७६२३५५३) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगे यांच्या नियोजन बद्ध मार्गदर्शनाखाली प्राचार्य प्रा. सतीश मांडवे व प्राचार्य डॉ.मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली अभ्यासू शिक्षकांच्या सहकार्याने सदर प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे सुरू आहे. डी.फार्मसीच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशनसाठी मिळालेल्या विक्रमी प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर स्वेरीच्या दोन्ही महाविद्यालयात विद्यार्थी व पालकांची गर्दी होत आहे.

# जेऊरच्या नागोबा गणेशोत्सव तरुण मंडळास तालुका स्तरीय द्वितीय पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जेऊर/प्रतिनिधी : अक्कलकोट पोलिस स्टेशन तर्फे २०२४ गणेशोत्सव मिरवणूक प्रोत्साहन पुरस्कार यावर्षी विरभद्रेश्वर तरुण मंडळ मैंदरगी यांना प्रथम तर जेऊर येथील नागोबा गणेशोत्सव तरुण मंडळ यांना द्वितीय क्रमांक तर जेऊर येथील बसवेश्वर तरुण मंडळ यांना तृतीय क्रमांक पटकावला.

सार्वजनिक गणेशोत्सव सन २०२४ च्या अक्कलकोट तालुकास्तरीय गणेशोत्सव मंडळातून तीन नंबर काढून बुधवारी दिनांक ९ आक्टोबर रोजी सायंकाळी अक्कलकोट तालुक्याचे तहसीलदार मगर साहेब व अक्कलकोट दक्षिण पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांच्या हस्ते मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना ट्रॉफी, शाल, देऊन सन्मानित करण्यात आले, यावेळी पोलीस निरीक्षक महेश स्वामी बोलताना असे म्हणाले की मला या तीन मंडळाचा सार्थ अभिमान आहे की ज्यांनी डॉल्बी मुक्त मिरवणूक काढून इतर मंडळांसाठी एक आदर्श निर्माण केला, लोकांना मिरवणूकीवेळेस त्रास न होऊ देता झालेली मिरवणूक ही आदर्श ठरते.यावेळी बीट हवालदार राऊत,घंटे,मियावाले,दासरे,अजय भोसले, पोलिस पाटील रहिमान अत्तार,व मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.



# शंकर सुरवसे यांची सोलापूर जिल्हा युवक काँग्रेस आउट रेट सेल चे अध्यक्षपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शंकर सुरवसे यांनी युवक काँग्रेसमध्ये काम केलेले आहे त्यांच्या कामाचे त्यांना फळ मिळालेले आहे. शंकर सुरवसे यांनी सोलापूर जिल्हा युवक काँग्रेस आऊट रिच सेलच्या अध्यक्षपदी निवड पंढरपूर येथील काँग्रेस सोबत प्रामाणिकपणे काम करत असल्याने प्रदेशाध्यक्ष डॉक्टर शफिक अहमद यांच्या आदेशानुसार सुरवसे यांची निवड करण्यात आली ही निवड सोलापूरचे खासदार प्रणिती शिंदे यांच्या शिफारशी अनुसार झाले आहे पंढरपूर शहरात सुरवसे यांनी आपल्या संघटन कौशल्याने काँग्रेस वाढवले आहे वाढवत आहेत त्यांचे काम किंवा काँग्रेसमध्ये पक्ष वाढवण्याचे काम त्यांनी केलेले आहे त्यामुळे त्यांची ही निवड करण्यात आलेली आहे त्यांनी लोकसभा मतदारसंघांमध्ये जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रयत्नही केलेले होते त्यामुळे त्यांच्या निवडीचे फळ त्यांना मिळाले आहे.



शंकर सुरोशे यांची सोलापूर जिल्हा युवक काँग्रेस आऊट रिच सेलच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ६८ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

# समाजाचे विश्वासू नेते बनून समाजाला योग्य मार्गदर्शन करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने आपल्या प्रगतीसाठी देशाला मिळणाऱ्या सत्तेमध्ये आपण भागीदार झालेच पाहिजे. करिता समाजाचे विश्वासू नेते बना आणि समाजाला योग्य मार्गदर्शन करा. या डॉ. आंबेडकरांच्या विधानावर छत्रपती संभाजी नगर येथे ६ आक्टोबरला कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना एड. महादेव आंधळे म्हणाले की, नेत्याबद्दल समाजाला आस्था वाटली तरच नेतृत्व उदयास येऊन टिकू शकेल. देशातील सर्व प्रकारच्या निवडणूकीत वंचित, आदिवासी, बहुजन समाजाला प्रत्यक्ष भाग घेता येत नसल्याने भांडवलदारांचे प्राबल्य व घराणेशाही चालत आहे. सामान्य माणसाकडे गंगाजळी उपलब्ध नसल्याने ते प्रवाहाबाहेर फेकल्या जातात. मतदारांनी सुद्धा नैतिकतापूर्ण भूमिका सोडली आहे. परिणामी आपणच शत्रूला संधी उपलब्ध करून देत असतो. लाभार्थी समाज सुद्धा रस्त्यावर येत नसल्याने खाजगीकरणाची अंमलबजावणी होत आहे. तोडा व फोडा नीतिचा वापर करून वंचित, आदिवासींना विभाजित केले जात आहे. करिता मागासवर्गीयांनी एकत्रित येऊन विश्वासू नेत्यांना मतदान करून निवडून द्यावेत.

**याप्रसंगी मिलिंद बागूल म्हणाले की, या चळवळीचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी आपण सक्रीय सहभाग घेतला पाहिजे. महादेव डांबरे म्हणाले की, एका काळात हजेरी पुस्तकावर सुद्धा अस्पृश्यांचे नांव लाल अक्षरात लिहिले जायचे. गांधी टिळकांचे अनुयायी होते, ज्यांनी स्वराज्याची मागणी करून तेली,तांबोळी, कुणबटांना संसदेत जाऊन नांगर हाकायचे आहे काय? असे म्हटले होते. आपणास मिळालेले शिक्षण हे फुले शाहू आंबेडकरांची देण आहे. मत आमचे व राज तुमचे हे फार काळ चालवू नये. धनराज गोंडाणे म्हणाले की, प्रगती होण्यासाठी प्रतिनिधी उच्च शिक्षित असावेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ध्येय धोरणांनुसार पुढे चालले पाहिजे.**

प्रमुख वक्ते इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, आपण बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणे चारित्र्यसंपन्न झाले पाहिजे. या आंदोलनाचा कारवाँ पुढे नेता येत नसेल तर किमान मागे तरी जाऊ देऊ नये. यासाठी कार्य केले पाहिजे. आपण फुले शाहू आंबेडकरांना नीट समजावून घेतले पाहिजे. तसेच सक्षम व योग्य प्रतिनिधी निवडून दिले पाहिजेत. कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकाचे व त्यांच्या टीमचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केल्या आहेत. किमान सामाजिक कळकळ असणाऱ्यांनी एकत्रित चर्चेने निर्णय घेऊन अंमलबजावणी केली पाहिजे. उद्घाटक एड. महादेव आंधळे साहेबांनी म्हटल्याप्रमाणे आपण सर्व मागासवर्गीय नागवंशीय असल्याने आम्ही सुद्धा या सर्वांना संघटीत करून आंदोलन चालविण्यासाठी दि ऑल इंडिया नाग असोसिएशन अर्थात आईना ची स्थापना केली आहे. करिता सर्व व्यवहारात जीएसटी म्हणजे गुडस एंड सर्व्हिस टॅक्स देत असलो तर आंबेडकराईट आंदोलनातील सर्व कृती कार्यक्रमासाठी उत्पन्नाच्या पाच टक्के अर्थात विसावा हिस्सा हे एएसटी म्हणजे आंबेडकराईट सर्व्हिस टॅक्स दिलाच पाहिजे. या सर्व बाबी नीट समजून घेऊन देशाच्या सत्तेतील आपली भागीदारी सुनिश्चित करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजनावर सजगता यावी म्हणून सदरील विधानावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.



या कार्यशाळेचे सुत्रसंचालन व आभार महादेव डांबरे तर प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला इंजिनिअर किशोर पाटील, एड. महादेव आंधळे, धनराज गोंडाणे, मिलिंद बागूल, देवकांत मेश्राम, ए. एन. तायडे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.